**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५७/२०२०** **दिनांक १७/०७/२०२०** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ११/०७/२०२० ते १७/०७/२०२०)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक १८/०७/२०२० सकाळी ८:३० पासून २२/०७/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **११/०७** | **१२/०७** | **१३/०७** | **१४/०७** | **१५/०७** | **१६/०७** | **१७/०७** | | **१८/०७** | **१९/०७** | **२०/०७** | **२१/०७** | **२२/०७** |
| १४.० | २६.० | २८.० | १९.० | ३५.२ | - | - | **पाऊस (मिमी)** | २० | २५ | २९ | १५ | १० |
| ३२.८ | ३३.० | ३३.२ | ३३.२ | ३३.० | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३४ | ३३ | ३२ | ३२ | ३३ |
| २४.२ | २३.२ | २३.२ | २४.२ | २४.० | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २६ | २६ | २६ | २६ |
| ४ | ५ | ५ | ४ | ४ | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ५ | ५ | ८ | ८ | ८ |
| ८६ | ८८ | ८६ | ९० | ८४ | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९१ | ९१ | ९० | ९० | ९० |
| ८६ | ७३ | ७८ | ८६ | ८२ | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७६ | ७५ | ७३ | ७४ | ६८ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १२ | ११ | १२ | ११ | ७ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै.द. | नै.द. | नै. | नै.द. | नै.द. |

**हवामान सारांश/ ईशारा**

**ठाणे जिल्हयात दिनांक १७ ते २० जुलै, २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी आणि २१ जुलै रोजी बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे. विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक २२ ते २८ जुलै २०२० दरम्यान सरासरीपेक्षा कमी पाऊसाची शक्यता आहे.**

| **पिक** | **अवस्था** | **हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पुर्नलागवड** | • हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता बाह्य स्तोत्रातून पाण्याची उपलब्धता करून भात पुर्नलागवडीची कामे पूर्ण करून घ्यावीत.<br>• हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता पुर्नलागवड केलेल्या भात खाचरात लावणीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करण्यासाठी शेताची बांधबंधीस्ती करून घ्यावी. |
| **नागली** | **पुर्नलागवड** | • हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता नागली पुर्नलागवडीची कामे पूर्ण करून घ्यावीत. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • हापूस आंब्यामध्ये वर्षाआड फळे धरण्याचा गुणधर्म १० वर्षानंतर प्रकर्षाने दिसून येतो. यासाठी पूर्ण वाढलेल्या (१० वर्षावरील) हापूस आंब्याला दरवर्षी नियमित फळे धरण्यासाठी झाडाच्या विस्ताराचा पूर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर व्यास मोजून त्याची सरासरी काढून विस्ताराच्या प्रति मीटर व्यासास ३ मि.ली. या प्रमाणात कल्टारची (पॅक्लोब्युट्राझोल) मात्रा पाऊसाची तीव्रता कमी असताना द्यावी. पॅक्लोब्युट्राझोलची आवश्यक मात्रा ३ ते ५ लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या बुंध्याभोवती विस्ताराच्या निम्म्या अंतरावर १० ते १२ सें.मी. खोल असे सम अंतरावर २५ ते ३० खड्डे मारून त्यात द्रावण समप्रमाणात ओतावे, नंतर खड्डे मातीने बुजवून टाकावे. पॅक्लोब्युट्राझोल देण्यापूर्वी झाडाभोवती असलेले तण काढून टाकावे. पाऊसाची तीव्रता कमी असताना पॅक्लोब्युट्राझोलची आळवणी करावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **वाढीची अवस्था** | • कारली, पडवळ, दुधीभोपळा, दोडका भाजीपाला पिकावर तांबडे भुंगे, पाने खाणारी अळी, पाने पोखरणारी अळी इ. किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी मेलाथिओन ५० टक्के प्रवाही २० मिली किंवा डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १५ मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसाच्या अंतराने पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी. (पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.) |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**